# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१९९ दिनांक -२७/०५/२०२४

## ऑनलाईन फसवणुक झालेली ५६,१००/-रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे १) तक्रारदार नामे श्री. प्रितेश यांना त्यांचे बँकेतुन नवीन क्रेडिट प्राप्त झाले होते. तक्रारदार यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन करुन एमएसईबी ऑफीस मधुन बोलत असल्याचे सांगुन तुमचे लाईट बिल भरले नाहि तर लाईट कट करण्यात येईल असे सांगुन लिंक पाठवली व सदरची लिंक तक्रारदार यांनी डाउनलोड करुन त्यांना क्रेडिट कार्डची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती दिली असता क्रेडिट कार्डचे खात्यातुन **एकुण १९,६००/- रुपये कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला.** २) तक्रारदार नामे श्री. दिपेश यांना त्यांचे बँकेतुन नवीन क्रेडिट प्राप्त झाले होते. तक्रारदार यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन करुन एमएसईबी ऑफीस मधुन बोलत असल्याचे सांगुन तुमचे लाईट बिल भरले नाहि तर लाईट कट करण्यात येईल असे सांगुन लिंक पाठवली व सदरची लिंक तक्रारदार यांनी डाउनलोड करुन त्यांना क्रेडिट कार्डची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती दिली असता क्रेडिट कार्डचे खात्यातुन **एकुण २०,०००/- रुपये कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला.** ३) तक्रारदार नामे श्रीमती. आशा यांना त्यांचे बँकेतुन नवीन क्रेडिट प्राप्त झाले होते. तक्रारदार यांना बँकेतुन कॉल आहे असे सांगून तुमची कट झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता तुम्हाला ओटीपी प्राप्त होईल असे सांगीतले.तक्रारदार यांनी ओटीपी शेअर केल्याने तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डचे खात्यातुन **एकुण १६,५००/- रुपये कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला.** सदर फसवणुकीबाबत तक्रारदार यांचे तक्रारी अर्ज सायबर पोलीस ठाणे येथे प्राप्त करण्यात आले होता.

१) **(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.११६५/२०२४ दिनांक १५/०५/२०२४.)**
२) **(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.९०९/२०२४ दिनांक ०६/०५/२०२४.)**
३) **(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.६१८/२०२४ दिनांक ०५/०३/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम ऑनलाईन ई कॉमर्स वेबसाईटवर वर्ग झाल्याचे दिसुन आले त्याचेशी तात्काळ पत्रव्यवहार करुन व्यवहार थांबवण्यात आलेले आहे. त्यानंतर तक्रारदार यांची वर्ग झालेली रक्कम तात्काळ गोठवुन त्यांचे मुळ खात्यात वर्ग होणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. **त्या अनुषंगाने तीन तक्रारदार यांची फसवणुक झालेली ५६,१००/- रु त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **विज बिल भरण्याबाबत मोबाईलवर मॅसेज प्राप्त झाल्यास मॅसेजच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे,मपोअं/१३१०४ पल्लवी निकम, मपोअं/१३०८७अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी,पोअं/राहुल बन,मपोअं/स्नेहल पुणे, मपोअं/ जयवंती वसावे, पोअं/ओंकार खाटीक पोअं/सावन शेवाळे,पोअं/ओंकार डोंगरे,मसुब/प्रविण सांवत व मसुब/सोनाली मोरे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**